# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि- 461 /2020** **दिनांक: 31/05/2020**

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. **महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक** 13 मार्च, 2020
3. **साथरोग अधिनियम,**1897
4. **सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक** 14 मार्च 2020
5. **या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि**-314/2020 **दिनांक** 17.05.2020
6. **महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे नोटीफीकेशन क्र.**
No.DMU/2020/CR.92/DisM-1 **दिनांक** 19 मे 2020
7. **या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि**-336/2020 **दिनांक** 21.05.2020
8. **महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे नोटीफीकेशन क्र.**
No.DMU/2020/CR.92/DisM-1 **दिनांक** 31 मे 2020

## आदेश

**ज्या अर्थी**, महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दि. 13 मार्च 2020 चे अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (कोव्हिड 19) उद्भवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे व या विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपायोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासुन सुरु करण्यांत आली आहे.त्या अनुषंगाने अकोला जिल्हयामध्ये तसेच राज्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्यामुळे आपतकालिन योजना करणे गरजेचे असल्यामुळे अकोला जिल्हायामध्ये संदर्भीय आदेश क्र. 5 अन्वये **दिनांक 31.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता संचारबंदी लावण्यात आली आहे. आणि**

**ज्याअर्थी** महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. स्पष्टीकरण No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 19 मे 2020 मध्ये नमूद केल्यानुसार **दिनांक 31.05.2020 पर्यंत लॉकडाऊन चा कालावधी वाढविण्यात आला असून मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. आणि**

**ज्याअर्थी,**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. स्पष्टीकरण No.DMU/ 2020/CR.92/DisM-1 दिनांक 31 मे 2020 अन्वये सुधारीत मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली असून लॉकडावूनचा कालावधी **दिनांक 30 जून चे मध्यरात्री** पर्यंत वाढविण्यात आला आहे. **आणि**

**ज्या अर्थी,** अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग झालेल्या रुग्णांमध्ये झपाटयाने वाढ होत आहे. कोरोना विषाणूने संसर्ग झालेल्या व्यक्ती हया बहुतांश महानगरपालिका क्षेत्रामधील असून शहराच्या सर्व भागामध्ये Containment Plan नुसार सर्व क्षेत्र प्रतिबंधीत करण्यात आले आहे. **आणि**

**त्याअर्थी** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष-2/प्रस/गृह/कावि-314/2020 दिनांक 17.05.2020 व तसेच दिनांक 21 मे 2020 रोजी रोजी निर्गमित केलेले **आदेश पुढील आदेशापर्यंत कायम ठेवण्यात येत असल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

..2..

वरिल आदेशांचे उल्लंघन केल्यास त्यांचेवर परिशिष्ट 3 मध्ये नमूद केल्यानुसार आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 , फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 , भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 व इतर संबधित कायदे व नियम यांचे अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक 31 मे 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

Office Of The District Magistrate सत्यमेव जयते AKOLA

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
जिल्हादंडाधिकारी, अकोला
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलीपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
२. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी २ुपरिषद अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
४. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
५. जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
६. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
७. सहा. आयुक्त, अन्न व औषधी प्रशासन, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता
८. मॅनेजर लिड बँक, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
९. उपविभागीय अधिकारी ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
१०. तहसिलदार -------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
११. विभाग प्रमुख ---------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
१२. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

जिल्हादंडाधिकारी, अकोला
जिल्हादंडाधिकारी,अकोला